**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 7.384
Volume - 7, Issue - 8, August - 2024

DOIs:10.2018/SS/202408009 --:-- Research Paper / Article / Review

# प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालयीन ग्रंथालयाचे योगदान

[1] श्री. अशोक घोडके , [2] डॉ. दया पाटील ,
[1] ग्रंथपाल, सरस्वती महाविद्यालय, केज जिल्हा. बीड. महाराष्ट्र
[2] ग्रंथपाल, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र
Email - ashokgh9767@gmail.com

**गोषवारा:** प्राध्यापकाच्या संशोधन करण्यासाठी ग्रंथालयाची फार मोठी भूमिका आहे. ग्रंथालयाशिवाय प्राध्यापकांचे संशोधनकार्य पूर्ण होणे अशक्य आहे. म्हणून ग्रंथालय वेगवेगळ्या माहिती तंत्रज्ञानाच्या उपक्रमातून संशोधक प्राध्यापकांना आकर्षित करत आहेत. ग्रंथालय ही महत्त्वाची माहिती केंद्र बनली आहेत व याचाच उपयोग प्राध्यापकांना संशोधनासाठी होऊन हेच प्राध्यापक विद्यार्थीना नवनवीन माहिती देत आहेत. ग्रंथालये प्राध्यापकांच्या संशोधन कार्यांत विकासात्मक भूमिका बजावत आहेत याविषयी या संशोधन पेपर मध्ये अढावात्मक चर्चा केली आहे.

**शोध संज्ञा:** ग्रंथालये, प्राध्यापक, संशोधन.

## 1. प्रस्तावना:

माणूस हा समाजशील प्राणी आहे. मानवाने बुद्धीच्या जोरावर अनेक सामाजिक संस्थाची निर्मिती केली आहे. मानवाने गरज निर्माण झाली की संशोधन करून त्यावर उपाययोजना करण्याचा नेहमी प्रयत्न केला आहे. त्यापैकी शैक्षणिक संस्था एक होय. या संस्थेतून अनेक प्रकारचे ज्ञान त्यांनी मिळवले हे ज्ञान संग्रहित ठेवण्यासाठी आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर करण्यासाठी ग्रंथालय निर्माण केली गेली.

माहिती व ज्ञान संग्रहण हे ग्रंथासोबत नियतकालिकातील लेख छोट्या पुस्तिका अहवाल एखादे छापील भाषण समीक्षा संशोधन पर लेखन इत्यादींना ग्रंथा इतका दर्जा देण्यात आला. बदलत्या काळामध्ये प्रिंट संशोधन साहित्य हे संग्रहण करण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन ग्रंथ व ग्रंथ इतर वाचन साहित्य माहिती संग्रह व जतन करून संशोधकाला देण्याचे काम ग्रंथालय करताना दिसत आहेत. आजचे ग्रंथालय वाचकाला हवे ते वाचन साहित्य कमीत कमी वेळात अद्यावत व परिपूर्ण माहिती देण्याचे कार्य करताना आपण पाहत आहोत.

या संशोधन पेपर मध्ये 'बीड जिल्ह्यातील महाविद्यालय स्तरावर अध्ययन व अध्यापन करत असणाऱ्या प्राध्यापकांच्या संशोधन कार्यातील महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान' संबंधी चर्चा करण्यात येणार आहे.

## 2. संशोधन:

संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध होय. प्राध्यापकांना संशोधन करण्यासाठी पुस्तके संदर्भ ग्रंथ, नियतकालिके तसेच वेगवेगळी माहिती तंत्रज्ञान यावर आधारीत माहिती यांचा आधार घ्यावा लागतो. उच्च शिक्षणामध्ये तर संशोधनास फार महत्त्व आहे. शिक्षण जशी निरंतर चालणारी प्रक्रिया आहे तसेच संशोधन प्रक्रिया सुद्धा चालूच असते. एखाद्या समस्येच्या निराकरणासाठी संशोधनातून मार्ग काढावा लागतो व त्यानंतर त्यातील उणीवा दूर केल्या जातात. थोडक्यात संशोधनाशिवाय प्राध्यापकांच्या ज्ञानामध्ये भर पडू शकत नाही.

## 3. संशोधनाचे महत्व:

पुस्तकांची जागा आता माहिती तंत्रज्ञान साधनांनी घेतली आहे. जगातील कोणतीही माहिती ही ताबडतोब डाउनलोड करून प्रिंट काढता येते अशावेळी प्राध्यापकांना संशोधनासाठी केवळ साधने असून चालत नाहीत तर ते हाताळण्याचे प्रशिक्षण सुद्धा आवश्यक आहे. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे परंपरागत शिक्षणाची चौकट मोडून काढल्यामुळे

प्राध्यापकांना संशोधनासाठी नवीन पद्धतीवर अवलंबून राहावे लागत आहे व नवीन तंत्रज्ञानाचा त्यांना महाविद्यालयासाठी स्वीकार करावा लागेल. त्यासाठी प्राध्यापकांना संशोधनासाठी ग्रंथालयाची भूमिका ही फार महत्त्वाची आहे. अध्यापकांनी त्यांच्या संशोधनासाठी ग्रंथालयातील वाचन साहित्याचा पुरेपूर लाभ घेतला तर ते त्यांच्या संशोधन कार्यामध्ये सक्षम होतील व त्यांचे संशोधन कार्य सुद्धा व्यवस्थित चालू राहील त्यासाठी ग्रंथालय सुसज्ज व माहीतीच्या साधनाने परिपूर्ण असतील हे पहावे लागेल व त्यात ग्रंथपाल व ग्रंथालय यांची मोलाची भूमिका ठरू शकते.

**4. संशोधनात्मक ग्रंथालये: काळाची गरज:**

संशोधनात्मक ग्रंथालय हे केवळ ग्रंथांचा संग्रह करणारी वास्तू नसून ते एक ज्ञानाचा निरंतर वाहणारा झरा आहे. संशोधनात्मक ग्रंथालय म्हणजे माहीतीचा प्रवाह, सततच्या मूळ स्रोतापासून निरंतर उपयोगकत्यापर्यंत त्वरेने सहजगत्या होण्या करता कार्यरत असलेली एक सक्षम सुसज्ज अशी ज्ञान यंत्रणा होय. परिचयात्मक ,वर्णनात्मक, प्रायोगिक असे संशोधनाचे तीन प्रधान हेतू सांगितले जातात. तर मूलभूत, उपयोजित व आवण वक्रयात्मक हे संशोधनाचे तीन मुख्य व्यवहारोपयोगी प्रकार मानले गेले आहेत.

**5. महाविद्यालय किंवा उच्च शिक्षणातील ग्रंथालयाचे महत्त्व:**

शिक्षणाचा प्राथमिक उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान वाढ करण्याचा नसून स्वतंत्र अभ्यासाची सवय, माहिती निर्मिती व सर्वांगीण विकास आणि लोकशाही जीवनामधील पद्धतीमध्ये असलेल्या व्यवहारिक दृष्टिकोन समोर ठेवून इतरांमध्ये सामील होणे हा आहे. शैक्षणिक उद्दिष्टे ग्रंथालयाशिवाय अवगत होऊ शकत नाहीत. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामाजिक संस्था म्हणून महाविद्यालय ग्रंथालये पूर्ण करण्याचे काम तसेच वाचकांना सेवा व सुविधा देऊन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसून येतात.

विद्यापीठ शिक्षण मंडळाने (१९४८-१९४९) विद्यापीठ सारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रंथालयाच्या महत्त्वावर जोर देऊन सांगितले की, ग्रंथालय हे सगळ्या महाविद्यालयाचे हृदय असून ते प्रत्यक्ष संशोधन व अप्रत्यक्षपणे शैक्षणिक कार्यात संशोधनातून जिवंतपणा निर्माण करतात. वैज्ञानिक संशोधन व सामाजिक संशोधनात ग्रंथालय हे महत्त्वाचे कार्य करत असते. ग्रंथालय हे संशोधनांमध्ये ग्रंथालय आणि प्रयोगशाळा दोन्हीचे कार्य एकत्रित करत असतात.

**6. संशोधन निबंधाचे उद्दिष्टे:**

प्राध्यापकाच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान अभ्यासण्यासाठी पुढील प्रमाणे उद्दिष्ट निश्चित केले आहे ती पुढील प्रमाणे आहेत.

1. बीड जिल्ह्यातील प्राध्यापक महाविद्यालय स्तरावर करत असलेले संशोधन कार्य जाणून घेणे.
2. प्राध्यापकाच्या संशोधनातील महाविद्यालय ग्रंथालयाची योगदान.
3. प्राध्यापकांच्या महाविद्यालय ग्रंथालयाकडून असणाऱ्या अपेक्षा जाणून घेणे.
4. प्राध्यापकांचे ग्रंथालयात बद्दलचे समाधान जाणून घेणे.

**6.1. संशोधन निबंधाची व्याप्ती व मर्यादा:**

हा लेख आढावा स्वरूपात आहे. या संशोधन अभ्यासासाठी व्याप्तीही बीड जिल्ह्यातील बीड, अंबाजोगाई, परळी, केज, आष्टी, पाटोदा, माजलगाव, वडवणी, धारूर, गेवराई, शिरूर तालुक्यापुरतीच असून मर्यादा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नित बीड जिल्ह्यातील महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान पुरती आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यास ज्या महाविद्यालयातील कार्यरत प्राध्यापकाच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाची योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**6.2. बीड जिल्ह्याची भौगोलिक माहिती:**

बीड:-महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा प्रादेशिक विभागातील पीडीएफ जिल्हा आहे यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. बीड जिल्ह्यात विशेष धार्मिक स्थळ आहेत बीड तालुक्यात मनमत स्वामी समाधी चाकरवाडी २१ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊली समाधी बंकट स्वामी समाधी नेकनूर आद्यकवी मुकुंदराज समाधी अंबाजोगाई जोगाई देवी मंदिर आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग परळी येथे आहे. पाटोदा तालुक्यात रामेश्वर मंदिर या धार्मिक स्थळाबरोबर बीड जिल्ह्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नित ६९ महाविद्यालय कार्यरत आहेत. या महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाची योगदान याबद्दल अभ्यास केला आहे.

1. बीड जिल्ह्यातील कार्यरत महाविद्यालयापैकी २० महाविद्यालय विनाकारणीत आहेत यापैकी ४९ महाविद्यालय अनुदानित आहेत.
2. बीड जिल्ह्यातील ४० महाविद्यालयाचे न्याक मूल्यांकन झाले आहे २९ महाविद्यालयाचे न्याय मूल्यांकन झाले नाही.
3. महाविद्यालय स्तरावर कार्यरत प्राध्यापकांचे संशोधन कार्य सतत चालू आहेत असे दिसून आले.

4. महाविद्यालयातील प्राध्यापक आपल्या विषयासंबंधी संशोधनाचे प्रमाण जास्त दिसून आले.
5. संशोधन पर पेपर घेणाऱ्या प्राध्यापकांचे प्रमाण जास्त दिसून येते.
6. महाविद्यालयातील प्राध्यापक कॉन्फरन्स सेमिनार मध्ये पेपर लिहिण्याचे प्रमाण जास्त आहे.
7. महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनासाठी अद्यावत संशोधन वाचन साहित्य मिळवण्यासाठी विद्यापीठ ग्रंथालयावर अवलंबून राहावे लागते.
8. महाविद्यालय तील प्राध्यापकांना ग्रंथालय विभागात इंटरनेट सुविधा वाढ करण्यात यावी .

**7. निष्कर्ष:**

वरील सर्व माहितीवरून अशी निष्कर्ष मिळतात की: -

1. महाविद्यालय स्तरावर प्राध्यापकांचे संशोधन कार्य सतत चालू असल्याचे दिसून येते.
2. महाविद्यालय सरावर कार्य प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात ग्रंथालयाचे योगदान २० टक्क्यापासून ६० टक्क्यापर्यंत आहे अशी दिसून येते.
3. महाविद्यालय ग्रंथालयात उपलब्ध न झालेल्या माहिती मिळवण्यासाठी विद्यापीठ ग्रंथालय किंवा वाचन साहित्य खरेदी करून माहिती मिळवण्याचे प्रमाण २० ते ४० टक्के आहे.
4. महाविद्यालय ग्रंथालय सेवा सुविधा बाबत प्राध्यापक समाधानी आहेत.
5. महाविद्यालय ग्रंथालयांनी अद्यावत माहिती स्त्रोत वाढ व ग्रंथालय इंटरनेट सेवा वाढ करण्यात यावी.
6. प्राध्यापकाच्या संशोधन कार्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी वाचन साहित्य अद्यावत येणे आवश्यक आहे.
7. महाविद्यालय स्तरावर प्राध्यापकांना संशोधनामध्ये प्रथम महाविद्यालय ग्रंथालयाची मदत होत आहे त्यानंतर विद्यापीठ ग्रंथालय त्याचबरोबर वैयक्तिक खरेदी बुक्स इंटरनेट सेवा आधारे संशोधनकार्य पूर्ण करताना दिसून येत आहेत.

**संदर्भ :**

1. बडे, दिलीप,(२००९) वार्षिक अहवाल, औरंगाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
2. पाटील श्रीराम, (2002( मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद.
3. फडके, द.ना., (2009) ग्रंथालयात 2.0 तंत्रज्ञानाचा वापर. ज्ञानगंगोत्री, 24.
4. Surwade YP, Naikar S, Kapadi R and Patil DT (Dalve), 2024. National Education Policy (NEP 2020) and Libraries: A Study. PEARL - A Journal of Library and Information Science, Vol. 18, No. 2, pp. 102-108
5. Surwade, Y. P., Kapadi, R. V., & Patil, D. T. (2023). Utilization of Library Resources and Services by the PG Students of JSSP College, Goveli, Maharashtra-A Study. In National Conference on Seventy Five Years of Indian Library Profession (pp. 360-367). Atharva Publications. https://www.researchgate.net/publication/371367865_Utilization_of_Library_Resources_and_Services_by_the_PG_Students_of_J_S_S_P_College_Goveli_Maharashtra_-_A_Study
6. The Shorter Oxford English Dictionary on Historical Principles, Oxford, 1985, p. 1804
7. The Advanced Learner's Dictionary of Current English. Oxford, 1952 p. 1069